**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/७५/२०२४
दिनांक – २४ .०२.२०२५

**प्रति,**

१. जावेद महिबुबसाब गुलबर्गा
रा. ताज बावडी रोड, खॉजानगर,
विजापूर जि.विजापूर ............................**अपिलार्थी**

**विरुध्द**

१. साहेरा जैनुद्दीन नगारजी
२. इमामसाब जैनुद्दीन नगारजी
३. सुरैय्या शौकत नगारजी
४. अझरूद्दीन शौकत नगारजी
५. निलोफर शौकत नगारजी
६. अल्मास वसीम मकानदार
७. रूबाबबी नजीरअहमद गवंडी
८. मंडळ अधिकारी वळसंग ता.जत जि.सांगली

अ.क्र. १ व २ रा. दुधाळ वस्ती, चमकेरी अपार्टमेंटजवळ, जत ता. जत जि.सांगली
अ.क्र. २ रा. विठ्ठलनगर, जत ता. जत जि.सांगली
अ.क्र. ३,४,५ रा. घर नं.७०३, सावरवान गल्ली, खाणभाग सांगली ता.मिरज जि.सांगली
अ.क्र. ५ रा.अचकनहळळी, ता. जत जि.सांगली
अ.क्र. ६ रा. बदाम चौक, हिना कीराणा दुकानजवळ, सारवान गल्ली, खणभाग,
अ.क्र. ७ रा.मोरे कॉलनी, सातारा रोड, जत ता.मिरज जि.सांगली
सांगली ता. मिरज जि.सांगली ...................... **जाबदार**

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे
## निकालपत्र

मौजे. उंटवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ३४, ३५ या मिळकत प्रकरणी मंडळ अधिकारी, वळसंग यांनी फेरफार नंबर २६६९, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसादेऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो,प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन दि.०२.०७.२०२४, ०६.०८.२०२४, ०३.०९.२०२४, ३१.१२.२०२४ व २८.०१.२०२५ अन्वये म्हणणे मांडणेकामी वारंवार संधी देणेत आली आहे. पैकी दि. ०२.०७.२०२४, ०३.०९.२०२४, ३१.१२.२०२४ व २८.०१.२०२५ या तारखांना अपिलार्थी / विधीज्ञ गैरहजर राहिलेले आहेत. तसेच प्रकरणी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांना www.eqjcourts.gov.in या संगणक प्रणाली दवारे सुनावणी बाबत एस. एम. एस व विधीज्ञ यांना whatsapp द्वारे सुनावणी कामी कळवून देखिल उक्त सुनावणी दिनांकास हजर रहिले नाहीत. तसेच जाबदार यांना नोटीस बजावणीकामी कोणतेही प्रयत्न केलेल नाहीत. तसेच प्रस्तुत अपील चालविणेकामी अपिलार्थी हे काही एक प्रयत्न करीत नसलेचे दिसून येत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे अपील अपिलार्थी यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ अन्वये प्रस्तुत प्रकरण कामकाजातून

काढून टाकणे आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण – जत
दिनांक – २४ .०२.२०२५

**प्रत– तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**